सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५,
ई-मेल-desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/२०२०/१००६ दिनांक : 03 DEC 2020

**परिपत्रक / तात्काळ**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची पडताळणी करणेबाबत**

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/२०२०/७२६, दि.१५/९/२०२०

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये आपल्या संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, परीक्षा मंडळाची संलग्नता इत्यादी माहिती तपासणी/पडताळणी करुन ऑनलाईन पध्दतीने माहिती अद्ययावत करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेच्या अनुषंगाने मंजूर प्रवेश क्षमता व इतर अनुषंगिक माहिती संचालनालयाच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दर्शविलेली आहे.

त्याअनुषंगाने संबंधितांना या परिपत्रकान्वये पुन:श्च कळविण्यात येते की, या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व पदविका संस्थांची संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली प्रवेश क्षमता संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीश: स्वत: तपासणी / पडताळणी करावी. सदर प्रवेश क्षमतेमध्ये काही तफावत/त्रुटी आढळल्यासच त्याबाबतची **माहिती फक्त diploma@dtemaharashtra.gov.in या ईमेलवरच दि. ०५/१२/२०२० रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत** सादर करावी. सदर प्रसिध्द केलेल्या प्रवेश क्षमतेबाबत उपरोक्त **विहित मुदतीत** या संचालनालयास दिलेल्या इमेलवर त्रुटीसंदर्भात काहीही कळविण्यात आले नाही, तर संस्थेच्या प्राचार्यांनी सदर माहिती तपासली असून ती बरोबर आहे, असे गृहीत धरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश करण्यात येतील, यांची नोंद घ्यावी.

**( डॉ. अभय वाघ )**
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना :

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती / औरंगाबाद / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे. त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विभागातील सर्व संबंधित पदविका संस्था प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

२) कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई. यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक या संचालनालयाच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच पुढील उचित कार्यवाही करावी.

३) प्राचार्य / संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका संस्था

*E/Bhadekar/Letter*